**महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरण**
Maharashtra Housing & Area Development Authority
**जनसंपर्क विभाग**
कक्ष क्र. १९/२०, तळ मजला, गृहनिर्माण भवन, कला नगर,
वांद्रे पूर्व, मुंबई - ४०००५१. दू. क्र. :- ०२२ ६६४०५०७७,
६६४०५०६६ ई मेल - cpromhada@gmail.com

==========================================================================

जावक क्रमांक - ३२६ दिनांक :- २५ जानेवारी, २०२२

प्रसिद्धीपत्रक

## म्हाडामध्ये राष्ट्रीय मतदार दिनानिमित्त लोकशाहीवर निष्ठा ठेवण्याची शपथ घेण्याचा कार्यक्रम

मुंबई, दि. २५ जानेवारी, २०२२ :- राष्ट्रीय मतदार दिनानिमित्त आज महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या (म्हाडा) गृहनिर्माण भवन या मुख्यालयातील अधिकारी- कर्मचारी यांना लोकशाहीवर निष्ठा ठेवण्याची शपथ देण्याचा कार्यक्रम घेण्यात आला.

कोरोनाच्या वाढत्या प्रादुर्भावाचा विचार करता म्हाडातील विभागप्रमुख / कार्यालय प्रमुख यांनी त्यांच्या अधिनस्त कर्मचाऱ्यांना त्यांच्या कार्यालयातच दुपारी १२ वाजता सदर शपथ दिली. म्हाडाच्या विभागीय मंडळांमध्येही सदर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

भारत निवडणूक आयोगाची २५ जानेवारी १९५० रोजी स्थापना झाली असून हा दिवस संपूर्ण देशभरात "राष्ट्रीय मतदार दिन" म्हणून साजरा करण्यात येतो. देशातील मतदारांना समर्पित केलेल्या या दिवसाचा उपयोग मतदारांचा निवडणूक प्रक्रियेतील सहभाग वाढावा म्हणून जनजागृतीसाठी केला जात आहे. राष्ट्रीय मतदार दिनाचे औचित्य साधून या दिवशी सर्व मतदारांना लोकशाहीवर निष्ठा ठेवण्याची शपथ दिली जाते.

म्हाडातील अधिकारी-कर्मचारी यांनी 'आपल्या देशाच्या लोकशाही परंपरांचे जतन करू आणि मुक्त निःपक्षपाती व शांततापूर्ण वातावरणातील निवडणुकांचे पावित्र्य राखू व प्रत्येक निवडणुकीत निर्भयपणे तसेच धर्म, वंश, जात, समाज, भाषा यांच्या विचारांच्या प्रभावाखाली न येता किंवा कोणत्याही प्रलोभनास बळी न पडता मतदान करू' अशी शपथ घेतली.

(सही /-)
मुख्य जनसंपर्क अधिकारी / प्राधिकरण



